**ANNEXURE-III**

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

# Trust Deed/ Bylaws/Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))

**Faculty - Ayurveda**
**Name of College / Institute- Shreemati Shantibai Otarmal Jain Ayurvedic Medical College**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | **Bhartiya Education Social Charitable Trust** |
| Registration Certificate | | Trust / Society Society:-**E521(Raigad)- Attached**<br><br>Hospital (Bombay Nursing Act):-<br>**Hosp.Reg.No.155 Dt. on.12.07.2023 to 31.03.2026- Attached** |
| Name of the College / Institute (As per First Affiliation letter) | : | **Shreemati Shantibai Otarmal Jain Ayurvedic Medical College** |
| Address | : | **At. Velshet, Post. Pigonde, Tal. Roha, Dist. Raigad, Maharashtra -402106** |
| Email ID | : | **jainayurvedacollege@gmail.com** |
| Telephone / Mobile No.(s) | : | **02194222523/ 8779159348 / 9892924655** |
| Website | : | **www.ssojar.in** |
| College Code | : | **121113** |

**Date: 02.02.2024**

**Dean / Principal Stamp & Signature**

**Principal**
Bhartiya Education Social Charitable Trust's
Smt. Shantibai Otarmal Jain Ayurvedic College
(Velshet). Tal. Roha. Dist. Raigad.

Exh. 3A.

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

अ. क्र. 557 महाराष्ट्र MAHARASHTRA

M 430049

न्यायीक/न्यायीकेतर मुद्रांक रक्कम रु. ...100/-
करितां रु. .......100/-...... दिला त्यास पुरवणी
...................... . .......... चा स्टॅम्प
घेणार किशोर ओटरमल जैन यांच्या
तर्फे सेक्रेटरी
रा नागोठणे ता. रोहा ता.
रोनी दिला.
अलिबाग 18 FEB 2006

D.D. Navare
कु. दिपाली दत्तात्रेय नवरे
मुद्रांक विक्रेती
अलिबाग-रायगड
परवाना क्र.

कोषागार अधिकारी
रायगड-अलिबाग

7 FEB 2006

विश्वस्त निधी पत्राची मूळ प्रत निशाणी 3 A चौकशी क्र. 26/2006 चे कामी दाखल केलेली होती ती आज अर्जदारास परत करण्यात आली. चौकशी अधिकारी

## --:: विश्वस्तनिधी पत्र ::--

" भारतीय एज्युकेशन / सोशिअल चॅरिटेबल ट्रस्ट " मु.पो. नागोठणे, ता. रोहा जि. रायगड "

१) श्री. किशोर ओटरमल जैन, वय वर्षे- ४०,
व्यवसायः- व्यापार, रा. अंजु पार्क, बाजारपेठ,
मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड.

... प्रथम पक्षिय विश्वस्त निधी पत्रकर्ते (सेटलॉर)

28/4/06

आणि

१) श्री. किशोर ओटरमल जैन, वय वर्षे- ४०,
व्यवसायः- व्यापार, रा. अंजु पार्क, बाजारपेठ,
मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड.

२) सौ. संगिता किशोर जैन, वय वर्षे - ३६,
व्यवसायः- गृहिणी, रा. अंजु पार्क, बाजारपेठ,
मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड.

} द्वितीय पक्षिय विश्वस्त

BHARTIYA EDU./SOCIAL CHARITABLE TRUST R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.) NAGOTHANE

| | | |
|---|---|---|
| ३) | श्री. ओटरमल शेषमल जैन, वय वर्षे- ६७,<br>व्यवसायः- व्यापार, रा. अंजु पार्क, बजारपेठ,<br>मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड. | द्वितीय पक्षिय विश्वस्त |

या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचा करार प्रथम पक्षीय विश्वस्त निधीपत्र कर्ता (सेटलॉर) आणि द्वितीय पक्षीय विश्वस्त यांचेमध्ये दिनांक १८/०२/२००६ रोजी मु. नागोटणे, ता. रोहा, जि.रायगड येथे करण्यांत आला.

ज्याअर्थी प्रथम पक्षीय विश्वस्तनिधीपत्रकर्ता यांची इच्छा या विश्वस्तनिधी पत्रामध्ये नमूद केलेले हेतू, उद्दिष्टांसाठी सार्वजनिक न्यास निर्माण करण्याचा आहे आणि त्यासाठी न्यास निर्मात्याच्या मालकी हक्काचे रोख रु. २०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) विश्वस्तनिधी म्हणून खाली केलेल्या करारातील तरतूदीनुसार द्वितीय पक्षीय विश्वस्तांचे हवाली केलेले आहेत. ज्याअर्थी द्वितीय पक्षीय या विश्वस्तपत्रातील तरतूदीनुसार विनियोग करण्यासाठी न्यासाचे प्रथम पक्षीय विश्वस्त म्हणून रहावयास तयार आहेत. आणि ज्याअर्थी प्रथम पक्षीय विश्वस्त व्यवस्थापन कर्ता हे द्वितीय पक्षीय विश्वस्त यांचेशी करार करीत आहेत त्याअर्थी सदरच्या विश्वस्त व्यवस्थापत्रातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत

**या विश्वस्त व्यवस्था पत्रातील साक्ष येणेप्रमाणे -**

१. या विश्वस्त व्यवस्थापत्राला अनुसरुन सर्व विश्वस्त न्यासाच्या अनामत रक्कमेचा निर्मात्यांच्या इच्छेनुसार आणि त्याची इच्छा फलद्रुप होण्यासाठी विश्वस्त या नात्याने स्विकार करतील व तिच्या गुंतवणूकीतून येणारा नफा, लाभांश अगर इतर कोणतेही उत्पन्न याचा विनियोग प्रथम न्यासाचे मुख्य उद्देश पार पाडण्याकरीता अगर त्यांच्याकडून करण्यांत आलेल्या इतर कोणत्याही परंतु योग्य प्रकारच्या त्या सर्व खर्चासाठी करतील. इतर अन्य अपरिहार्य गोष्टींसाठी करावा लागणारा सर्व खर्च या निधीतून करतील.

२. या विश्वस्त व्यवस्थापत्राला अनुसरुन सर्व विश्वस्त न्यासाच्या अनामत रक्कमेच्या सुव्यवस्थेसाठी एकमेकांचे सहविश्वस्त या नात्याने सार्वजनिक न्यासासाठी घोषीत, अभिव्यक्त शर्तीप्रमाणे अंगीकारण्याचे ठरविले आहे.

३. विश्वस्तव्यवस्थापत्राला अनुसरून विश्वस्तांजवळ सुपूर्द केलेल्या रु. २०००/- "विश्वस्तनिधी" म्हणून संबोधण्यात येईल. त्या निधीची वृध्दी होण्यासाठी तो गुंतवणूक करणे, तात्पुरत्या ठेवी घेणे-देणे, वगैरे वाढीसाठी रुपांतर करण्याचा विश्वस्तांना अधिकार राहील. आणि विश्वस्तनिधीतून होणा-या वर्धमान रक्कमेला पुन्हा विश्वस्तनिधीत सामाविले जाईल.

४. या विश्वस्तव्यवस्थापत्राला अनुसरुन वरील विश्वस्तनिधीपासून मिळणारे उत्पन्न, लाभांश, नफा वगैरे मिळकतीतून योग्य तो खर्च वजा जाता सर्वसाधारणपणे घोषित अभिव्यक्त केलेला हेतू यांना बाधा न येता विश्वस्तनिधीचा विनीयोग केला जाईल.

५. विश्वस्तव्यवस्थापत्राला अनुसरुन वरील विश्वस्तनिधीपासून मिळणा-या निव्वळ उत्पन्नाच्या रक्कमेतून शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, वैद्यकीय व क्रीडा या उद्देशाच्या कारणासाठी येणारा खर्च विद्यमान विश्वस्तांना आपल्या अबाधित असलेल्या अधिकारात करु शकतील.

आटरमल जैन

R. NO. E-521 Raigad Maharashtra (India)

- ३ -

६. आयकर अधिनियम १९६१ मध्ये सांगितलेल्या तरतूदीप्रमाणे आणि किंवा भारतात प्रचलित असलेल्या आयकर अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये होणा-या संबंधित प्रयोजनांवर निर्बंध घालण्याचा तसेच त्याबाबत विनिमय करण्याचा अधिकार राहील. आयकर नियमांसबंधी असलेल्या शर्ती, देणग्या, पैसा, निधी, बक्षीसपत्रे आणि इतर तत्सम कायदेशीर रक्कमेवरील भरावयास लागणा-या आयकराबाबत आयकर अधिनियम १९६१ मध्ये तरतूद करुन ठेवल्याप्रमाणे सहाय्यक सूट, तुटक सवलत मिळवतील.

७. या विश्वस्तव्यवस्थापत्राबाबत काहीही अंतर्भूत असले तरीसुध्दा विद्यमान विश्वस्तांच्या आपल्या अधिकारात न्यासाच्या उत्पन्नाच्या काही भागातून मूळ उत्पन्नातून तरतूदींना अधिन राहून समायोजित त्या काळात अनुसरुन शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकिय या विषयांवर खर्च करु शकतात.

८. या विश्वस्तपत्राला अनुसरुन न्यासाच्या प्राप्तीतून राहीलेला काही आवेदन न झालेला भाग, अशाप्रकारे वेळोवेळी जमा झालेल्या संचित निधीस शिल्लक अधिवय असे संबोधण्यात येईल. अशाप्रकारे जमा झालेला निधी उद्दशेपूर्तीसाठी खर्च करण्याचा सर्वाधिकार राहील.

**१) <u>विश्वस्त व्यवस्थेचे नांव व कार्यालय :-</u>**

या विश्वस्तपत्रान्वये निर्माण करण्यात आलेल्या सार्वजनिक न्यासाचे नांव " **भारतीय एज्युकेशन / सोशिअल चॅरिटेबल ट्रस्ट " नागोठणे, ता. रोहा जि.रायगड** असे राहील व तो यापुढ **भारतीय एज्युकेशन / सोशिअल चॅरिटेबल ट्रस्ट " नागोठणे, ता. रोहा जि.रायगड** या नावाने ओळखला जाईल. या न्यासाचे सद्याचे कार्यालय, द्वारा श्री. किशोर ओटरमल जैन, व इतर रा. 'अंजु पार्क, बाजारपेठ, मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड येथे राहील. न्यासाची स्वतंत्र जागा उपलब्ध झाल्यास कार्यालय तेथे हलविण्यांत येईल. न्यासाचे कार्यालय इतरत्र हलविण्याचा अधिकार विद्यमान विश्वस्तांना राहील. असा करण्यांत आलेला बदल मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अलिबाग विभाग, रायगड यांचेकडे कळविण्यांत येईल

**२) <u>विश्वस्त व्यवस्थेचे कार्यक्षेत्र :-</u>**

या विश्वस्त व्यवस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत देश राहील.

**२) <u>विश्वस्त व्यवस्थेचे उद्देश :-</u>**

१. सदर ट्रस्ट मुख्यत्वेकरुन समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धर्मादायी, शारीरिक, वैद्यकीय व बौधिकदृष्ट्या सवार्गिण उन्नती करण्यासाठी स्थापन करण्यांत आलेला आहे.

**शैक्षणिक :-** शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, त्यासाठी बालवाडी/पुर्वमाध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक/महाविद्यालय तसेच तसेच अनु.जाती/अनु.जमाती, भटक्या व विमुक्त जाती तसेच आदीवासी, वनवासी, इतर मागास वर्गीय यांच्या साठी निरनिराळया भाषिक अल्पसंख्यांक शाळा, आश्रमशाळा अंध-अपंगशाळा, मुकबधीर शाळा, वस्तीशाळा, रात्रशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना, सावित्रीबाई फुले दत्तक योजना, इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचा विशेष प्रचार, मॉन्टेसरी टिचर ट्रेनिंग कोर्स, कृषी महाविद्यालय, कायदे विषयक महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, संगीत महाविद्यालय, तांत्रीक महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय, (प्रि प्रायमरी ट्रेनिग, डि.एड., बि.एड., बि.पी.एड.बी.एड. फिजिकल) स्थापन करणे, चालविणे, अगर अशा संस्थेस उत्तेजन देणे. शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविलेल्या योजनांचा फायदा सर्व जनतेस मिळवून देणे.

— ४ —

BHARTIYA EDU./SOCIAL CHARITABLE TRUST R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.) NAGOTHANE

संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकाचे शास्त्रशुध्द शिक्षण देणे, शासनाने निश्चित केलेले अभ्यासक्रम/कोर्स शिकविणे यासाठी संगणक प्रशिक्षण केंद्र उभारणे, अत्याधुनिक क्षेत्रात संगणकाचे महत्व तसेच त्याद्वारे मिळणा-या रोजगाराच्या सुविधा याबाबत सुशिक्षित बेकार युवक/युवतींना देखिल माहती व प्रशिक्षण देणे.

समाजातील गरीब गरजू व होतकरु विद्यार्थ्यासाठी विद्यार्थी अभ्यास केंद्र, वसतिगृह चालविणे, वह्या, पुस्तके, गणवेश या शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे, हुषार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या/बक्षीसे देऊन त्यांचा गुणगौरव करणे, त्याच बरोबर पुस्तकपेढी योजना विद्यार्थी स्टेशनरी वस्तू भांडार शालोपयोगी वस्तूंचे उत्पादन असे कार्य करणे.

समाजामध्ये ज्ञानाची वृध्दी करण्यासाठी मोफत ग्रंथालय/वाचनालय स्थापन करणे व चालविणे.

१. **सांस्कृतिक, कला, क्रिडा :-** भारतीय संस्कृती विकास व जपणूक यासाठी समाजामध्ये शारीरिक शिक्षणाविषयी, आरोग्य शिक्षणाविषयी व खेळाविषयी स्फूर्ती निर्माण करणे, व महत्व पटवून देणे. पारंपारिक कलांची जपणूक करणे, नाविण्यपूर्ण कलांची दालने विद्यार्थ्यांना खुली करणे, तरुण/तरुणींच्या उपजत कला गुणांना वाव देणे, त्यासाठी फॅशन शो भरविणे, सौदर्य स्पर्धा, शरीर सौष्ठव स्पर्धा भरवून त्यांना उत्तेजन देणे, नृत्य, गायन शिवणकला, केशकर्तन, चित्रकला, हस्तकला, शिल्पकला, वक्तृत्व व अभिनय, मॉडेलींग अशा कला गुणांचा विकास करण्यासाठी प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे, मैदानी खेळ खेळण्यासाठी व्यायामशाळा व क्रिडा संकुलनाची स्थापना करणे, निरनिराळया खेळाचे प्रशिक्षण देणे, क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे, अंर्तराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी खेळाडू तयार करणे.

२. **आरोग्य :-** सामाजिक आरोग्यासाठी रक्तदान, नेत्रदान, कुटुंब कल्याण, लसीकरण, वैद्यकीय शिबीरे मोफत औषधोपराचाराची सोय, रुग्णवाहिकेची सुविधा निर्माण करणे, तसेच कुष्ठरोग,एड्स्ग्रस्त, एच. आय. व्ही. ग्रस्त समाजातील लोकांना आरोग्यसेवा, निवास, वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे, व त्यांच्या विधूर/विधवांना/मुलांना आपल्या पायावर उभे करण्याचे प्रयत्न करुन त्यांचे पुर्नवसन करणे, आरोग्य रक्षणार्थ सामाजिक वनीकरण, वृक्ष लागवड, ग्राम स्वच्छता अभियान अशा शासकीय योजनांद्वारे आरोग्य सुधारण्याचे प्रयत्न करणे व त्या राबवून पर्यावरणास सहाय्य करणे. गोर-गरीब लोकांसाठी रुग्णालय, वैद्यकिय महाविद्यालय, दवाखाना, प्रसुतिगृह, बाल कल्याण केंद्र अशा सामाजिक संस्था स्थापन करुन चालविणे. तसेच त्यांना आर्थिक मदत देणे.

३. **सामाजिक :-** १.समाजातील अनिष्ट चालिरिती, रुढी-परंपरा, अज्ञान, हुंडाबंदी, दारुबंदी हे नष्ट करणे. त्याकरिता निरनिराळे उपक्रम राबविणे. समाज मंदिर, संस्कार मंदिर बांधणे.

२. बालक व महिला यांच्या विकासासाठी वृध्दांच्या आधारासाठी व सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे, बालसंस्कार/बाल सुधार केंद्र, पाळणाघर, अनाथाश्रम, महिलाश्रम, वृध्दाश्रम, धर्मार्थ दवाखाने चालविणे.

३. समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे. आदिवासी, भटक्या व मागास, अल्पसंख्यांक समाजासाठी महिला व सुशिक्षित बेरोजगारांसाठी शासकीय, निम शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती व मार्गदर्शन करुन निरनिराळया व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणे. कुक्कुटपालन, शेळी/मेंढीपालन, दुग्ध व्यवसाय, लघुउद्योग, कुटिरोद्योग, तांत्रीक कोर्सेस, अतांत्रीक कोर्सेस, शेतीवर आधारित कोर्सेस, ~~सहकारी पतसंस्था, स्वयंसहाय्यता मंडळे,~~ त्याबरोबर महिलांसाठी शिवणकाम, पाककला, भरतकाम, विणकाम, फॅशन डिझायनिंग, ब्युटीशियन असे कोर्सेस चालविणे.

४. राष्ट्रीय एकात्मतेच्यादृष्ट्रीने सर्वधर्म समभावाची भावना समाजात एकता व बंधुभाव निर्माण करण्यासाठी सण/ उत्सव, सण-समारंभ, राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती/पुण्यतिथी साज-या करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. समाजातील धैर्यवान, कर्तबगार, निस्पृह, राजकीय, सामाजिक, पत्रकार व विविध क्षेत्रांतील नामवंत व गुणवंतांना संस्थेमार्फत पुरस्कार व गौरव चिन्ह देऊन सन्मानित करणे.

५. समाजात लोककला, नाटयकला, नृत्यकला, भरतनाटय, वादन-गायन संगीत कला इं. कला गुणांचा विकास होण्यासाठी सभागृहांची नाटयगृहांची उभारणी करणे,कलागुणांची जोपासना व विकास करणे.

६. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणीक, आध्यात्मिक, बौधिक व औद्योगि प्रगतीसाठी मुखपत्र, वर्तमानपत्र, पाक्षिक, मासिक, विविध विषयांवर लेख थोडक्यात साहित्य निर्मितीसाठी प्रयत्न करणे व प्रशिक्षण करणे.

७. संगीत, कला, संस्कार वर्ग यांची स्थापना करणे, ऐतिहासिक वास्तुंचे जतन करणे या बाबत मानवी जीवनाचा विकास घडवून आणणे. सर्व सामान्य जनतेसाठी उद्यान, योग केंद्र, धर्मशाळा, विश्रामगृह, याची स्थापना करुन विकास करणे.

८. सामान्य जनतेला मोठया प्रमाणावर आर्थिक फायदा देणारे तसेच स्वयंरोजगाराची निर्मिती करणा-या व्यवसायांची निर्मिती व विकास करणे प्रशिक्षण देणे.

९. अनाथ आणि निराधार मुला-मुलींसाठी व महिलांसाठी विविध उपक्रम हाती घेंणे व कार्यान्वीत करणे. आणि त्यांचे संपूर्ण पुर्नवसन करणे.

१०. अनु.जाती/ अनु.जमाती/ विमुक्त जमाती/ भटकी जमात/ विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागासवर्गिय इ. मागासवर्गियांसाठी शाळा व आश्रमशाळा, तसेच वसतिगृह बांधणे व चालविणे. तसेच या घटकांसाठी समाजोपयोगी कार्य करणे.

११. वृध्दांसाठी वृध्दाश्रम उभारणे व चालविणे, तसेच अपंगांसाठी शाळा व कार्यशाळा उभारणे व चालविणे व त्यांना कृत्रीम अवयव व अन्य सोयी सुविधा पुरविणे.

## ४) विश्वस्त मंडळ व त्यांची संख्या :-

न्यासाचे उद्देश पार पाडण्यासाठी आणि हया विश्वस्त व्यवस्थेची व्यवस्था नियमित व सुव्यवस्थित चालविण्यासाठी खालील व्यक्तींची हया विश्वस्त व्यवस्थेचे प्रथम विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यांत आली असून त्यांनी तशी मान्यता व संमती देखील दिली आहे. प्रथम विश्वस्त मंडळ ३ जणांचे राहील. पुढे गरज भासल्यास विश्वस्त संखेत वाढ केली जाईल.

| अ.क्र. | विश्वस्तांचे नांव | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १) | श्री. किशोर ओटरमल जैन | रा. अंजुपार्क, बाजारपेठ, मु.पो.नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड. | प्र. विश्वस्त |
| २) | सौ. संगिता किशोर जैन | रा. अंजुपार्क, बाजारपेठ, मु.पो.नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड. | विश्वस्त |
| ३) | श्री. ओटरमल शेषमल जैन | रा अंजुपार्क, बाजारपेठ, मु.पो.नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड. | विश्वस्त |

-- ६ --

BHARTIYA EDU./SOCIAL CHARITABLE TRUST R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.)

५) **विश्वस्त बदलाची रित :-**

या न्यासाचे सर्व विश्वस्त तहहयात राहतील. तसेच मध्यंतरीच कोणत्याही कारणाने रिक्त होणारे विश्वस्त पद अथवा पदे विश्वस्तांच्या वारसा हक्काने अथवा विश्वस्त मंडळाचे सभेत बहुमताने भरतील. मात्र निवड करण्यात आलेल्या विश्वस्ताने प्रथम त्या पदावर काम करणेस तयार असणे बाबतचे संमतीपत्र विश्वस्त मंडळाकडे दिले पाहिजे. सद्याचे विश्वस्त मंडळ ३ लोकांचे राहील. पुढे गरज भासल्यास विश्वस्त मंडळात वाढ केली जाईल.

६) **विश्वस्त पद/पदे रद्द करणेबाबत :-**

१. विश्वस्तांनी राजीनामा दिला असेल,अगर मृत्यु पावला असेल तर विश्वस्त पद रद्द होईल.
२. विश्वस्त व्यवस्थेच्या नियमाविरुध्द, उद्देशाविरुध्द, हिताविरुध्द वागत असेल व गैरवर्तन करीत असेल तर त्याचे विश्वस्त पद रद्द होईल.
३. फौजदारी गुन्हयात शिक्षा झाली असेल किंवा दंड झालेला असेल तर विश्वस्त पद रद्द होईल.
४. न्यायालयाने नादान ठरविले असेल तर त्याचे विश्वस्त पद रद्द होईल.
५. पूर्व सूचना न देता सतत ३ सभांना गैरहजर राहीला तर त्याचे विश्वस्त पद रद्द होईल.
६. कायम वास्तव्यास परदेशात गेल्यास त्याचे विश्वस्त पद रद्द होईल.
७. हिशेबाचे वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आंत सभासद वर्गणी जमा न केल्यास.

७) **न्यासाचे विश्वस्तांची पात्रता :-**

१. त्याचे वय २१ वर्षाचे वर असावे.
२. प्रतिष्ठित व चारित्र्यवान असावा व सदगुणी असावा.
३. न्यासाच्या कामात रस घेणारा असावा.
४. न्यासाच्या हिताविरुध्द कामकाज करणारा नसावा.
५. न्यासाचा ऋणको नसावा.
६. मनोरुग्ण व दिवाळखोर नसावा.
७. सदस्य रजिष्टरवर त्याची स्वाक्षरी असावी व त्याचेजवळ सदस्यत्व मंजूर केल्याचे प्रमाणपत्र असावे.
८. मा.धर्मादाय आयुक्त अथवा विभागिय सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे पूर्व परवानगीशिवाय सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी परदेशात वास्तव्य केलेला नसावा.

८) **विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी व त्यांचे कर्तव्य :-**

१. सध्या असलेल्या विश्वस्तांपैकी एका विश्वस्ताची न्यास नोंदणी नंतर अध्यक्ष म्हणून निवड केली जाईल व जोपर्यंत तो विश्वस्त अध्यक्षपदाचा राजीनामा देत नाही किंवा अध्यक्ष म्हणून काम करण्यास नकार देत नाही किंवा विश्वस्त म्हणून काम करण्यास अपात्र ठरत नाही तोपर्यंत अध्यक्ष म्हणून काम पाहील.

२. सभेमध्ये चर्चिले जाणारे सर्व विषय बहुमताने निर्णय घेऊन निकाली काढले जातील. जर एखाद्या वेळी ठरावाच्या बाजूने व विरोधात समान मते पडली तर अध्यक्षांना दुसऱ्या किंवा निर्णायक मताचा अधिकार असेल. मात्र या दस्तात इतरत्र काहीही लिहीले असले तरी जेव्हा विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेच्या विल्हेवाटीचा प्रश्न सभेत चर्चेला येईल. तेव्हा अध्यक्षांच्या संमतीशिवाय या प्रश्नावर निर्णय घेता येणार नाही.

९) **विश्वस्त मंडळाचे अधिकार :-**

१. विश्वस्त व्यवस्थेच्या प्रशासनावर व मालमत्तेवर देखरेख ठेवणे.
२. विश्वस्त व्यवस्थेच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे.
३. विश्वस्त मंडळाने बहुमताने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे.
४. सेवकवर्गाची नेमणूक अध्यक्षांच्या अधिकारीतेखाली करणे अथवा कमी करणे, त्यांच्या संबंधी आवश्यक ते नियम करणे.
५. विश्वस्त व्यवस्थेच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणेचे कामी शाखा-उपशाखा सुरु करणे, व त्या चालविणे. विश्वस्त व्यवस्थेच्या कार्याकरीता समिती-उपसमिती नियुक्त करणे, व कार्य समाप्ती नंतर ती रद्द करणे.
६. विश्वस्तव्यवस्थेचे जमाखर्च सनदी लेखापाल यांचेकडून तपासून घेणे, त्यासाठी लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
७. विश्वस्त व्यवस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करणे जरुरीनुसार त्यात बदल करणे.
८. विश्वस्त व्यवस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेत वाढ व घट करण्याचा पूर्ण अधिकार मंडळास राहील.

१०) **विश्वस्त मंडळाच्या सभा व तांतडीची मागणी सभा :-**

विश्वस्त मंडळाच्या दर तिन महिन्यानी एक सभा अशा वर्षातून एकूण चार सभा घेण्यात येतील. आवश्यकता वाटल्यास आणखी विश्वस्त मंडळाची जादा सभा बोलाविता येईल. विश्वस्त मंडळाचे विश्वस्तांपैकी ३/४ सदस्यांनी सबळ कारणासह लेखी अर्ज अध्यक्षांकडे दिल्यास अधिकारात तांतडीची मागणी सभा बोलावतील. लेखी अर्ज दिल्यावर अध्यक्षांनी १५ दिवसाचे आंत सभा न बोलाविल्यास लेखी अर्ज देणारे आपल्या अधिकारात सभा बोलावतील. सदर सभेस ३/५ विश्वस्त हजर असणे आवश्यक आहे. कारण सभेत सर्व प्रकरणी बहुमताने निर्णय घेतला जाईल. अशी सभा विश्वस्त व्यवस्थेच्या जागेत घेणे उचित ठरेल. व त्यावेळी घेतलेले निर्णय विश्वस्त मंडळास बंधनकारक राहतील.

११) **विश्वस्त मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

विश्वस्त मंडळाच्या सभेची सुचना १४ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. सुचना डाकबूकात सही घेऊन अथवा टपाल दाखला घेऊन टपालाद्वारे पाठविता येईल. सभेची लेखी सुचना दिल्यानंतर सर्व विश्वस्त सभासदांनी संबंधित सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. विश्वस्त मंडळाचे ३/५ विश्वस्त उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजण्यांत येईल. परंतु गणसंख्येअभावी कोणतीही सभा तहकूब झाल्यास अर्धा तास वाट पाहून त्याच ठिकाणी त्याच विषयासाठी पुन्हा सभेचे कामकाज सुरु केले जाईल. अशा सभेस गणसंखेची आवश्यकता असणार नाही. परंतु अशी टिप सुचनेमध्ये ( नोटीसमध्ये) असणे आवश्यक आहे.

१२) **बहुमताचा ठराव :-**

विश्वस्तांचे सभेत येणा-या विषयावर बहुमताने निर्णय घेतले जातील. प्रत्येक विश्वस्तांना एकाच मताचा अधिकार राहील. ज्यावेळेस ठरावाच्या बाजूने व विरुध्द समसमान मते पडतील अशा वेळेस अध्यक्षांना एक जादा मत देण्याचा अधिकार राहील. व त्यावेळेस जो निर्णय होईल त्यास अंतिम मान्यता देण्यात येईल.

-- ८ --

R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.)

१३) **सभावृत्तांत नोंदवही :-**

विश्वस्तांचे सभेचे आणि कामकाजाची एक स्वतंत्र सभावृत्तांत नोंदवही ठेवण्यांत येईल. अशा सभावृत्तांत नोंदवहीत अजेंडयाप्रमाणे विश्वस्तांच्या सभेत होणा-या ठरावाची स्पष्टपणे नोंद घेतली जाईल. सभावृततांत नोंदवहीत घेण्यात आलेले ठराव पुढील सभेत मंजूर करुन आपली स्वाक्षरी करतील

१४) **बँक खाते :-**

न्यासाचा सर्व पैसा, निधी, देणगी, अनुदान तसेच स्थावर व जंगम मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न इतर मार्गाने येणा-या सर्व रक्कमा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ मधील तरतूदीप्रमाणे बँकेत जमा करावयाचे आहेत. कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा शासनमान्य अधिकृत बँकेत विश्वस्त व्यवस्थेच्या नांवे खाते ठेवण्यांत येईल. व ते न्यास निर्माता (अध्यक्ष), व इतर दोन विश्वस्त यांचे संयुक्त नांवे राहील. तसेच बँक व्यवहारासाठी न्यास निर्मात्याची स्वाक्षरी आवश्यक असून इतर २ विश्वस्तांपैकी एक अशा दोन पदाधिका-यांचे संयुक्त स्वाक्षरीने बँकेचे देवाण-घेवाणीचे व्यवहार करण्यांत येतील.

१५) **हिशोब वर्ष :-**

या विश्वस्त व्यवस्थेचे हिशोबाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील.

१६) **न्यासाच्या मालमत्तेत स्वाधिनता :-**

या सार्वजनिक न्यासाची सर्व स्थावर व जंगम मालमत्ता ही न्यासाच्या मालकीची राहील. व व्यवस्थापन आणि कारभाराच्या दृष्ट्रीने ही सर्व मालमत्ता या योजनेच्या तरतूदीप्रमाणे नेमण्यांत आलेल्या अथवा भविष्य काळात नेमल्या जाणा-या विश्वस्तांच्याच नांवे वहिवाट व व्यवस्थेकरिता राहतील. तसेच या न्यासाचे विश्वस्त या योजनेनुसार न्यासाचे मालमत्त्वेची व्यवस्था व वहिवाट करतील. व विश्वस्त न्यासाचे उद्देश पार पाडतील. सन १९५० च्या सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम तसेच १९५१ चे सार्वजनिक न्यास नियम यांचेशी सुसंगत राहील.

१७) **स्थावर व जंगम मालमत्ता नोंदवही :-**

विश्वस्त व्यवस्थेचे स्थावर व जंगम मालमत्तेची नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यांत येईल. नविन्न वस्तूंच्या व मिळकतीच्या नोंदी सविस्तरपणे नोंदवहीत नमूद करण्यांत येतील. तसेच न्यास निर्माता व इतर विश्वस्तांनी स्थावर व जंगम मालमत्तेची प्रत्यक्ष पहाणी व पडताळणी करुन त्यावर तशी स्वाक्षरी करतील.

१८) **विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेबावतचे व्यवहार :-**

विश्वस्तांना विश्वस्त व्यवस्थेच्या मालकीची मालमत्ता विकणे, गहाण ठेवणे, अदलाबदल करणे, भाडेपट्टयाने देणे, कर्ज घेणे, गुंतवणूक करण, असे व्यवहार करता येतील. परंतु त्यासाठी सर्व विश्वस्तांची विश्वस्त मंडळाच्या सभेत मंजूरी घ्यावी लागेल. तसेच मा.धर्मादाय आयुक्त/धर्मादाय सहआयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ३५ व ३६ प्रमाणे पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच या विश्वस्त पत्राला अनुसरुन विश्वस्त व्यवस्था निधी आणि इतर रक्कम ताबडतोब विश्वस्त व्यवस्थेच्या कारणाकरिता तात्काळ खर्च करावी न लागणारी रक्कम भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९८२ आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० तसेच आयकर अधिनियम १९६१ अन्वये रोख्यात गुंतविण्याचा आणि त्यात वेळोवेळी बदल करण्याचा सर्व अधिकार विद्यमान विश्वस्तांना राहील. उपरोक्त व्यवहार मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार करण्यांत येईल.



BHARTIYA EDU SOCIAL CHARITABLE TRUST
R. NO. E-521
Raigad
Maharashtra
(India.)
NAGOTHANE

१९) **विश्वस्त व्यवस्थेची मिळकत :-**

विश्वस्त व्यवस्थेच्या मिळकतीमध्ये सर्व स्थावर व जंगम मिळकतीचा समावेश राहील. बक्षीसपत्रान्वये मिळालेल्या, खरेदी केलेल्या, परकीय चलनाद्वारे स्विकारलेल्या, विश्वस्त व्यवस्थेच्या नांवे मिळालेल्या गुप्तधन, भेट इत्यादी सर्व विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता म्हणून समजली जाईल. परदेशी व्यक्ती अगर संस्था यांच्याकडून देणगी अथवा बक्षीस घेण्याचा अधिकार संस्थेस राहील.

२०) **खर्चाबाबत तरतूद :-**

विश्वस्त व्यवस्थेला मिळणारे स्थावर मिळकतीचे उत्पन्न, देणगी, अनुदान, इमारतीचे भाडे व इतर मार्गाने येणा-या उत्पन्नातून नोकरवर्गाचा पगार, विद्युत आकार, इमारत डागडूजी, शासकीय कर, नगरपालिका कर, शेतसारा व इतर कायदेशीर बाबींचा खर्च हा जमा होणा-या उत्पन्नातून केला जाईल. खर्च वजा जाता जी रककम शिल्लक राहील ती इतर उद्योगांकरीता खर्च केली जाईल. या विश्वस्तपत्राला अनुसरुन वरील विश्वस्त निधी पासून मिळणा-या निव्वळ रक्कमेच्या उत्पन्नातून धर्मादाय व धार्मीक, शैक्षणीक, सामाजीक, सांस्कृतीक व वैद्यकीय उद्येशांसाठी येणारा खर्च विद्यमान विश्वस्तांना अध्यक्षांच्या देखरेखीखाली करण्याचा अधिकार राहील.

२१) **विश्वस्त व्यवथ्येच्या मिळकतीची दुरुस्ती :-**

न्यासाकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्यास विश्वस्त आपल्या अधिकारात अनामत रक्कमा देणगी, व कर्जाऊ रक्कम उभी करुन डागडूजी, दुरुस्ती अथवा नविन बांधकाम इत्यादी विश्वस्त आपल्या देखरेखीखाली करतील.देणगीरुपाने अथवा कर्जाऊ घेतलेली रक्कम ज्या उद्येशासाठी घेतली असेल ती त्याच उद्येशावर खर्च करण्यांत येईल. विश्वस्तांचे लेखी पूर्व परवानगीशिवाय इतरास कोणत्याही त-हेची देणगी, वर्गणी गोळा करण्याचा अधिकार नसेल. असे केल्यास संबंधीत व्यक्ती फौजदारी गुन्ह्यास पात्र राहील.

२२) **नोकरवर्ग नेमण्यासंबंधी :-**

**अ)** विश्वस्त व्यवस्थेच्या दैनंदिन कामासाठी अगर इतर शाखांच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेला नोकरवर्ग म्हणजे सचिव, व्यवस्थापक, वकील, हिशेब तपासणीस, वास्तूशास्त्रज्ञ, अभियंता भूमापक, गुमास्ता व इतर सेवकवर्ग योग्य त्या अटींवर नेमण्याचा व कमी करण्याचा तसेच त्यांच्या सेवेबाबतच्या शर्ती, नियम, वेतन, मानधन इ. ठरविण्याचा अधिकार विद्यमान विश्वस्त मंडळास राहील. प्रत्येक सेवक वर्ग त्यांचे पदानुसार दिलेली त्यांची कामे करतील.

**ब)** विश्वस्त व्यवस्थेच्या सेवेसाठी कोणत्याही नोकरास विश्वस्त व्यवस्थेच्या मालकीच्या जागेत अथवा इमारतीत विनामुल्य अथवा योग्य त्या अटींवर राहण्याची परवानगी विश्वस्तांना देण्याचा अधिकार राहील.

२३) **समित्या/उपसमित्या आणि शाखा सुरु करणेबाबत :-**

विश्वस्त व्यवस्थेच्या कामासाठी तसेच उद्येशपूर्तीसाठी आवश्यकता वाटल्यास समित्या/ उपसमित्या तसेच शाखा/उपशाखा स्थापन करता येतील. तसेच त्यांच्यासंबंधी नियम तयार करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, त्यांचा कार्यकाल ठरविणे इ. बाबतचा सर्व अधिकार विश्वस्तांना राहील.

-- १० --

BHARTIYA EDU. SOCIAL CHARITABLE TRUST R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.) NAGOTHANE

२४) **नियम अथवा पोटनियम तयार करण्याचा अधिकार :-**

या विश्वस्तनिधीपत्रातील तरतूदीनुसार विश्वस्त व्यवस्थेच्या प्रशासनासाठी विश्वस्तांना योग्य वाटतील असे नियम अथवा पोटनियम तयार करण्याचा आणि ते अंमलात आणण्याचा अधिकार विश्वस्तांना राहील. परंतु असे नियम व पोटनियम ह्या विश्वस्तपत्रातील तथा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० यामधील तरतूदींशी विसंगत असणार नाही. तसेच तयार केलेले नियम अथवा पोटनियमाची प्रत मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, अलिबाग यांचेकडे दाखल केल्याशिवाय अंमलात येणार नाही.

२५) या विश्वस्तनिधीपत्रातील कोणत्याही कलमाचे अर्थाविषयी व विश्वस्तपत्रानुसार केलेल्या व करावयाच्या कोणत्याही गोष्टींचे कायदेशिरपणासंबंधी निर्णय करण्याचा अधिकार मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, अलिबाग यांना असेल. व त्यांनी दिलेला निर्णय अखेरचा व बंधनकारक समजला जाईल.

२६) न्यासाच्या कारभारासंबंधी विश्वस्तांमध्ये आपापसात मतभेद वा वाद निर्माण झाल्यास वादाचे प्रकरण मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड यांचेकडे सूपूर्द करण्यांत येईल. व त्यासंबंधी सहाय्यक धर्मादाय आयुक्त , रायगड यांचा निर्णय सर्व विश्वस्तांवर बंधनकारक राहील.

२७) हा विश्वस्तनिधी सार्वजनिक, धार्मीक, वैद्यकीय शैक्षणीक व सांस्कृतीक न्यास असल्याने आयकर अधिनियम १९६१ व गिफ्ट अॅक्ट १९५८, वेल्थ टॅक्स अॅक्ट १९५७ आणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५१ अथवा अन्य कायद्याच्या सवलतींचा फायदा त्याच्या उपबंधानुसार मिळणा-या सवलतींकरिता योग्य ती उपाय योजना कार्यकृती, कार्यवाही करण्याचा अधिकार विश्वस्तांना राहील.

या विश्वस्तनिधीपत्रातील तरतूदीनुसार व नियमानुसार या विश्वस्त व्यवस्थेचे कार्य व प्रशासन विश्वस्तांनी करावयाचे आहे. तसे त्यांनी मान्य केले असून त्या प्रित्यर्थ हया विश्वस्तनिधीपत्रावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

येणेप्रमाणे हे विश्वस्तनिधीपत्र मौजे नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड मुक्कामी आज दिनांक १८/०२/२००६ रोजी स्वखुषीने करुन लिहून दिले आहे. तसेच त्यावर स्वाक्षरी केली आहे

ठिकाण :- नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड

दिनांक :- १८/०२/२००६

( श्री. किशोर ओटरमल जैन )
**विश्वस्तनिधीपत्रकर्ते**

खालील साक्षीदारांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करुन मोहोरबंद आणि स्वाधीन केलेले आहे. आमच्या समक्ष विश्वस्तनिधीपत्रकर्तानि या विश्वस्तनिधीपत्रावर स्वाक्षरी केली आहे.

| अ.क्र. | साक्षीदारांची नांवे | सही |
|---|---|---|
| १) | श्री. सुदाम दत्तत्रेय घाग | : |
| २) | श्री. मोहन मारुती वादळ | : |

-- ११ --

R. NO. E-521 Raigad Maharashtra (India.)

खालील साक्षीदारांच्या उपस्थितीत स्वाक्षरी मोहोरबंद आम्ही स्वाधीन केलेले आहे. तसेच विश्वस्तनिधी पत्रकर्ताकडून दिनांक १८/०२/२००६ रोजी रु.२०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) आम्हास मिळाले. असे आम्ही घोषित करीत आहोत.

| अ.नं | विश्वस्तांची नांवे | | सही |
|---|---|---|---|
| १) | श्री. किशोर ओटरमल जैन | : | |
| २) | सौ. संगिता किशोर जैन | : | |
| ३) | श्री. ओटरमल शेषमल जैन | | |

वरील १ ते ३ विश्वस्तांनी आमच्या समक्ष या विश्वस्तनिधीपत्रावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

| अ.क्र. | साक्षीदारांची नांवे | | सही |
|---|---|---|---|
| १) | श्री. सुदाम दत्तात्रेय घाग | : | |
| २) | श्री. मोहन मारुती वादळ | : | |

ठिकाण : नागोठणे (रोहा)

दिनांक : १८/०२/२००६

XXXXXXXXXXXX

सत्यमेव जयते

# आरोग्य विभाग

## रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

आरोग्य विभाग रा.जि.प अलिबाग

राजिप

08096
जा.क्र.राजिप/आरोग्य कुक/नर्सिंग रजिस्ट्रेशन/२०२3
आरोग्य विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
दिनांक 12/07/2023

(सन १९४९ च्या द बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टच्या कलम ५ - अन्वये दिलेले रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट)

## प्रमाणपत्र

द बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अन्वये डॉ. श्री. किशोर ओटरमल जैन, चेअरमन भारतीय एज्युकेशन / सोशिअल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित यांचे "श्रीम. शांतीबाई ओटरमल जैन, आयुर्वेदिक रुग्णालय" मु वेलशेत (नागोठणे) पो पिगोंडे, ता. रोहा जिल्हा रायगड येथील नर्सिंग होम रजिस्ट्रर केले असून सदरचे नर्सिंग होम चालविण्यास परवाना देण्यात येत आहे.

**रजिस्ट्रेशन क्रमांक :** 155 **प्रसुतीसाठी** 15 **कॉटस्**

**इतर रुग्णासाठी** 85 **कॉटस्**

ठिकाण : अलिबाग

सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक : 12/07/2023

सदरचे सर्टिफिकेट दिनांक ३१ मार्च 2026 पर्यंत कार्यवाहीत राहील.

RAIGAD ZILLA PARISHAD RZP Hospital Reg

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**